९.०० ✓
२२-१२-२३


# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दुरध्वनी क्र. ०२५१-२७२०११६, विस्तार क्र.२२५ proumc321@gmail.com


दिनांक : २२/१२/२०२३

# प्रेसनोट

मा . मुख्यमंत्री महोदयांनी राज्यातील सर्व महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामाविरुध्द कठोर कारवाई करण्याचे आदेश नुकत्याच संपन्न झालेल्या हिवाळी अधिवेशनामध्ये महापालिका आयुक्तांना दिलेले आहेत. त्या अनुषंगाने मा. प्रशासक तथा आयुक्त श्री. अजीज शेख यांनी दिनांक २१/१२/२०२३ रोजी अतिरिक्त आयुक्त, शहर व सहायक आयुक्त, प्रभाग समिती क्र.१ ते ४ यांची आढावा बैठक आयोजित केली होती. सदर बैठकीत शहरातील अनधिकृत बांधकामाविरुध्द कठोर कारवाई करण्याचे आदेश सर्व सहायक आयुक्त यांना देण्यात आले. अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांविरुध्द निष्कासन कारवाई तसेच सर्व प्रमुख रस्ते, चौक, पदपथ, अतिक्रमण मुक्त राहतील या दृष्टीने कारवाई करण्याचे आदेश देखिल देण्यात आले.

दिनांक २०/१२/२०२३ रोजी प्रभाग समिती क्र.२ चे कार्यक्षेत्रात भारत मारबल रोड, आझाद नगर, उल्हासनगर -२ येथे शासकिय भुखंडावर सुमारे ३००० चौ. फुटांचे गाळयांचे अनधिकृत बांधकाम सुरु असल्याचे दिसुन आले होते. सदरचे बांधकाम हे बेकायदेशिर असल्याने दिनांक २१/१२/२०२३ रोजी पुर्णपणे निष्कासीत करण्यात आले आहे. शहरात होणाऱ्या अनधिकृत बांधकामाविरुध्द यापुढे देखिल कठोर कारवाई सुरु ठेवण्यात येणार आहे.

(स्वाक्षरी) २२/१२/२३

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – माहितीस्तव.
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका
प्रत – योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
- सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.